# फ्लिपकार्ट होलसेलने डिजिटल बीटूबी परिसंस्थेत यशस्वी होण्यासाठी चॅलेंजर ब्रॅण्ड्समध्ये केली मोठी गुंतवणूक

- चॅलेंजर्स ब्रॅण्ड्सने फ्लिपकार्ट होलसेलच्या माध्यमातून 2021 मध्ये विक्रीत साध्य केली 1. 5 पट वाढ

**बेंगळुरू- सप्टेंबर 13, 2021:** भारतातील होमग्रोन फ्लिपकार्ट ग्रुपची डिजिटल बीटूबी मार्केटप्लेस फ्लिपकार्ट होलसेल देशभरातील बाजारपेठांमधील ब्रॅण्ड्सचा समावेश आपल्या प्लॅटफॉर्मवर यशस्वीरित्या करत आहे. अनेक ब्रॅण्ड्स आणि मोठ्या प्रमाणात विक्री करणारी किराणा व रिटेल दुकाने यांच्यातील दुवा म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडून प्लॅटफॉर्मने अनेक ब्रॅण्ड्सना यश मिळवून दिले आहे. आज फ्लिपकार्ट होलसेल 600हून अधिक चॅलेंजर ब्रॅण्ड्ससोबत काम करते.  हे ब्रॅण्ड्स कानपूर, नागपूर, बिकानेर, रामचंद्रपूरम (आंध्रप्रदेश), लुधियाना आदी श्रेणी-2 व श्रेणी-3 शहरांतील आहेत; डिजिटल कॉमर्सची संभाव्यता खऱ्या अर्थाने खुली करण्याच्या उद्दिष्ट फ्लिपकार्ट होलसेलपुढे आहे.

फ्लिपकार्ट होलसेलच्या माध्यमातून चॅलेंजर ब्रॅण्ड्सना वर्षभरात 1.5 पटीने विक्री वाढवणे शक्य झाले आहे, कारण, ब्रॅण्ड्सना त्यांच्या प्रादेशिक मर्यादा ओलांडून देशभरात विक्री करणे शक्य झाले आहे.

**फ्लिपकार्ट होलसेलचे वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रमुख आदर्श मेनन** म्हणाले, "फ्लिपकार्ट होलसेलमध्ये आमचे प्रमुख उद्दिष्ट हे स्थानिक स्तरावर विकसित तंत्रज्ञान व भक्कम पुरवठा साखळी क्षमतांचा वापर करून किराणा दुकाने व एमएसएमईंचे डिजिटल रूपांतरण शक्य करून देणे हे आहे. आमच्या प्लॅटफॉर्मने अत्यंत अल्पकाळात अनेक ब्रॅण्ड्ससाठी संप्रेरकाचे (कॅटालिस्ट) काम केले आहे, त्यांना प्रादेशिक सीमा ओलांडण्यात व यशाची नवीन उंची गाठण्यात मदत केली आहे. हे ब्रॅण्ड्स फॅशन, पर्सनल केअर, एनर्जी ड्रिंक्स, हॉट बेव्हरेजेस आणि पॅकेज्ड इंडियन फूड अशा अनेक विभागांतील आहेत. हे देशाच्या कानाकोपऱ्यातील ब्रॅण्ड्स आहेत आणि यांच्यातील बरेच छोट्या शहरांमधील आहेत. आम्ही सातत्याने विस्तार करत असल्याने आमच्या मूल्यविधानात सुधारणा करत असल्याने किराणा दुकाने व छोटे व्यवसाय त्यांचा व्यवसाय विस्तारून यशस्वी होण्यासाठी आमच्या प्लॅटफॉर्मचा लाभ घेऊ शकतात."

एकदा हे ब्रॅण्ड्स आमच्या प्लॅटफॉर्मवर आले की ते सातत्याने दिसत राहतात, त्यांच्या वितरणामध्ये व नेटवर्किंगमध्ये सर्व अंगांनी वाढ होत राहते. त्यामुळे त्यांच्या तुलनेत

पुरवठासाखळी व मार्केटिंगवर बराच अधिक खर्च करू शकणाऱ्या मोठ्या ब्रॅण्ड्सना स्पर्धा देणे या छोट्या ब्रॅण्ड्सना शक्य होते. फुलफिलमेंट सेंटर्स मोक्याच्या जागी स्थापन केली असल्याने फ्लिपकार्ट होलसेल मोठ्या प्रमाणात ग्राहक आकर्षून घेऊ शकते. परिणामी या ब्रॅण्ड्सच्या विक्री बिंदूंमध्ये अनेक पटींनी वाढ शक्य होते.

कान्हा नमकीन हा एक लोकप्रिय स्नॅक्स ब्रॅण्ड आहे. हा राजस्थानात अनेक वर्षांपासून उत्तम विक्री करत आहे पण या प्रदेशाबाहेर तो उपलब्ध नव्हता. आज हा ब्रॅण्ड यशस्वीरित्या उत्तरप्रदेश, जम्मू-काश्मीर, पंजाब व मध्यप्रदेशातील बाजारपेठांमध्ये पोहोचलेला आहे आणि मासिक तत्त्वावर 2 पटींनी वाढ साध्य करत आहे. याचे श्रेय होमग्रोन बीटूबी प्लॅटफॉर्म फ्लिपकार्ट होलसेलला जाते.

"फ्लिपकार्ट होलसेल प्लॅटफॉर्मने आम्हाला आमच्या ब्रॅण्डचे अस्तित्व प्रस्थापित करण्यात तसेच ऑनलाइन विक्रीला चालना देण्यात मदत केली आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि प्रत्यक्ष स्पर्शाचा मिलाफ साधल्यास येत्या सणासुदीच्या हंगामातही विक्री वाढवणे शक्य होईल असा आत्मविश्वास आम्हाला वाटत आहे," असे **कान्हा नमकीनचे संचालक पुनीत जेथलिया** सांगतात.

फ्लिपकार्ट होलसेलचे काम 15 राज्ये व केंद्रशासित प्रदेशात सुरू आहे आणि नवीन प्रदेशात सेवेचा विस्तार केला जात आहे, नवीन पिनकोड्सच्या भागात सेवा दिली जात आहे.

सुरक्षित व प्रमाणित विषमुक्त उत्पादनांचा उत्पादन ममाअर्थने उत्तर भारतात विक्री करण्यासाठी फ्लिपकार्ट होलसेलशी करार केला आहे. यामुळे केवळ 2 महिन्यांत एकंदर ऑफलाइन व्यवसायात 5 टक्के वाढीव विक्री झाली आहे. प्लॅटफॉर्मद्वारे मिळालेल्या बल्क ऑर्डर्स तसेच किराणा दुकानांसारख्या नवीन ग्राहकसमूहाशी संपर्क यामुळे हे शक्य झाले आहे. फ्लिपकार्ट होलसेल आता या ब्रॅण्ड्सची उत्पादने दक्षिण भारतात घेऊन जात आहे. "आमची फ्लिपकार्ट होलसेलसोबत झालेली भागीदारी उत्तमरित्या घडवलेल्या सहवासाप्रमाणे आहे. यामुळे ग्राहकांना योग्य उत्पादने, योग्य वेळी खरेदी करण्यास मदत होत आहे," असे **ममाअर्थचे सहसंस्थापक व सीईओ वरुण अलघ** सांगतात.

पॅकेज्ड भारतीय मिठाया आणि स्नॅक्सचे उत्पादन करणाऱ्या बिकानोकडे उत्तर प्रदेश व दिल्ली राजधानी परिसरात पुरवठा करण्यासाठी थेट व्यवस्था आहे. मात्र, प्लॅटफॉर्मचा लाभ घेत दक्षिण भारतातील बाजारपेठांमध्ये व्याप्ती दृढ करण्याचा प्रयत्न हा ब्रॅण्ड करत आहे. हेल एनर्जी ड्रिंक आणि वाघबकरी यांसारख्या ब्रॅण्ड्सनीही फ्लिपकार्ट होलसेलशी भागीदारी करून भारतभरातील बाजारपेठांमध्ये प्रवेश केला आहे. प्लॅटफॉर्मवर समावेश झाल्यापासून या सर्व ब्रॅण्ड्सना आलेला सामाईक अनुभव म्हणजे त्या सर्वांच्या वाढीला वेग मिळाला आहे.

फ्लिपकार्ट होलसेलची स्थापना भक्कम तंत्रज्ञानात्मक पाया व बाजारपेठेचे सखोल ज्ञान यांवर करण्यात आली होती. या प्लॅटफॉर्मने भारतभरातील बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवून देणारी, कार्यक्षम पुरवठा साखळीचे जाळे तयार करणारी, वित्तपुरवठ्यामध्ये सहाय्य करणारी परिसंस्था एसएमई ब्रॅण्ड्ससाठी तयार केली आहे. किराणा दुकानांना उत्पादनांच्या विस्तृत मालिकेची उपलब्धता, विश्वासार्ह दर्जा, वेगवान डिलिव्हरी व विनाकटकट मोबदला अशा स्वरूपांत फायदे मिळत आहेत. या प्लॅटफॉर्ममार्फत दिली जाणारी बाजारपेठांची माहितीही ब्रॅण्ड्स व किराणा दुकाने दोहोंना मागणीतील उत्पादनांबाबत माहितीपूर्ण निर्णय करण्यात उपयुक्त ठरत आहे.

फ्लिपकार्ट होलसेल ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

**फ्लिपकार्ट ग्रुपबद्दल**

फ्लिपकार्ट ग्रुप हा भारतातील एक आघाडीचा डिजिटल कॉमर्स उद्योगसमूह आहे आणि त्यात फ्लिपकार्ट, मिंत्रा, फ्लिपकार्ट होलसेल आणि क्लिअरट्रिप या ग्रुप कंपन्यांचा समावेश आहे. हा ग्रुप फोनपे या भारतातील एक आघाडीचे पेमेंट ॲपचा मेजॉरिटी शेअरहोल्डर आहे.

फ्लिपकार्टची स्थापना 2007 साली झाली. फ्लिपकार्टने लाखो ग्राहक, विक्रेते, व्यापारी आणि लघु उद्योगांना भारताच्या ई-कॉमर्स क्रांतींचा एक भाग होण्यासाठी सक्षम केले. त्यांचे 35 कोटींहून अधिक नोंदणीकृत ग्राहक आहे, त्यांच्यातर्फे 80+ विभागांमध्ये 15 कोटींहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतात. भारतात ई-कॉमर्सचे लोकशाहीकरण होण्यासाठी आमचे प्रयत्न, उत्पादनांची उपलब्धता आणि वाजवी किंमतीत उत्पादने उपलब्ध करून देणे, ग्राहकांना समाधान देणे, या अर्थचक्रामध्ये लाखो रोजगारांची निर्मिती करणे आणि उद्योजकांच्या व एमएसएमईंच्या अनेक पिढ्या घडविणे यामुळे या क्षेत्रातील अनेक गोष्टींचे उद्गाते होण्यास आम्हाला प्रेरणा मिळाली. कॅश ऑन डिलिव्हरी, नो कॉस्ट ईएमआय आणि सुलभ रिटर्न्स या ग्राहककेंद्री अभिनव उपक्रमांसाठी फ्लिपकार्ट ओळखला जातो. या ग्राहककेंद्री सुविधांमुळे लाखो भारतीयांसाठी ऑनलाइन खरेदी अधिक व्यवहार्य आणि परवडण्याजोगी झाली. आपल्या ग्रुप कंपन्यांसह फ्लिपकार्ट ग्रुप तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतातील व्यवसायक्षेत्राचे परिवर्तन घडविण्याचे कार्य सुरूच ठेवणार आहे.

अधिक माहितीसाठी कृपया media@flipkart.com येथे ईमेल पाठवावा.